PDF Compressor Free Version


# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,

10/2, स्टार्की टाऊन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर 440 001
दूरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

Maharashtra ECOTOURISM


**ई-मेलद्वारे**

**विषय**:-महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक 27/06/2023 रोजी आयोजित 18 व्या सभेच्या कार्यवृत्तांता बाबत.

**क्रमांक**:व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.121(भाग-4)/23-24/ 308

**नागपूर**: 440 001, **दिनांक** : 30/06/2023

**प्रति,**

1. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
3. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
4. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि.नागपूर तथा सदस्य कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.
5. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
6. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.
7. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
8. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी .

**संदर्भ** : या कार्यालयाचे पत्र क्रमांक:कक्ष-6/लल्ले/व्यसं/कासमभा/भाग-4/23-24/286, दि.23/06/2023

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची 18 वी सभा, मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 27/06/2023 रोजी दुपारी 04.00 वाजता "कमांड

PDF Compressor Free Version

कंट्रोल रूम, वनभवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र:- वरील प्रमाणे.**

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर (करीता)

**प्रतिलिपी:-**

1) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर/पुणे/औरंगाबाद यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.
2) वनसंरक्षक (प्रा), धुळे यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.
3) उप सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस अग्रेषित.
4) उपवनसंरक्षक, वनविभाग, कोल्हापूर/सोलापूर/सांगली/सातारा/जुन्नर/जळगांव यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.
5) विभागीय वन अधिकारी, रत्नागिरी (चिपळूण)/हिंगोली यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.
6) उप विभागीय वन अधिकारी, भोर यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर (करीता)

प्रत – कक्ष-2, योजना, मनिपविमं यांना सहपत्रांसह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

**प्रारुप**

PDF Compressor Free Version

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक २७/०६/२०२३ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या १८ व्या सभेचा कार्यवृतांत**

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची १८ वी सभा दिनांक २७ जून, २०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली **कमांड कंट्रोल रूम,** वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्य व आमंत्रित अधिका-यांची यादी (परिशिष्ट-१) नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य सचिव यांनी **अठराव्या सभेच्या** सुरूवातीला अध्यक्षांचे व उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसुचीनुसार सभेच्या कामकाजास सुरवात केली.

सभेमध्ये सर्व विषयांवर सविस्तर चर्चा होऊन कार्यकारी समितीद्वारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

सादरीकरण संबंधित उपवनसंरक्षक/ विभागीय वनाधिकारी यांनी केले.

सर्व मंजूर प्रस्तावांना पुढील सर्वसाधारण अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी प्रदान केलेली आहे.

(१) वन संवर्धन कायदा, १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७ व वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ चे कोठल्याहीप्रकारे उल्लंघन होणार नाही.

(२) महाराष्ट्र राज्य वन पर्यटन धोरण व वन पर्यटनासंबंधी वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेले शासन निर्णय/ सूचनांच्या विपरीत कामे करता येणार नाही.

(३) प्रत्यक्ष कामें ही मंजुर आराखडयानुसारच होतील. कामाचे प्रकार किंवा स्वरुप किंवा नवीन कामे घ्यावयाची असल्यास सुधारीत आराखडा महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकडून मंजुर झालेनंतरच पुढील कार्यवाही करावी.

(४) प्राचीन ऐतिहासीक स्मारके उदा. गड/किल्ले आदी यांचेशी संबंधित निसर्ग पर्यटनाची कामे करण्यापूर्वी संबंधित पुरातत्व विभागाची परवानगी प्राप्त करावी. अशी कामे ऐतिहासीक स्मारकाशी समरस होणारी असावीत याकरीता आवश्यक तांत्रीक मार्गदर्शन त्यांचे कार्यालयातील तज्ञांकडून घ्यावे.

PDF Compressor Free Version

| विषय क्रमांक | विषय | समितीचे निर्णय |
|---|---|---|
| १ | दिनांक ०२/०२/२०२३ रोजी झालेल्या १७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे. | यासंबंधी सविस्तर चर्चा होवून सर्वानुमते कार्यवृत्तांत कायम करण्यात आला. |
| २ | **निसर्ग पर्यटन विकास आराखडयांना मान्यता देणे.** | |
| २.१ | **दत्त टेकडी, इस्लामपूर निसर्ग पर्यटन विकास आराखडा, सांगली वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.१५३६.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.**<br>सदर निसर्ग पर्यटन स्थळाच्या आराखडयामधील बाब क्रमांक (२४) व (२५) करीता डी.पी.डी.सी. मधून निधी प्राप्त करावा. |
| २.२ | **रसाळगड ते सुमारगड ट्रेक रुट निसर्ग पर्यटन विकास आराखडा, चिपळूण वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.१३७.९२ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन आराखडयातील बाब क्रमांक ४ वगळून **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.३ | **मालदोली ट्रेकरुट तयार करणे निसर्ग पर्यटन विकास आराखडा, चिपळूण वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.५२.६० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन आराखडयातील बाब क्रमांक ४ वगळून **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.४ | **मौजे गमेवाडी येथील जटेश्वर, निसर्ग पर्यटन विकास आराखडा, सातारा वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.५५८.५१ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५ | उपवनसंरक्षक, सातारा यांचे विनंतीनुसार आराखडयाची मान्यता प्रलंबीत ठेवण्यात येत आहे. |
| २.५ | **मौजे कास पठार, निसर्ग पर्यटन विकास आराखडा, सातारा वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.२३५६.७० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन आराखडयातील बाब क्रमांक ५ व २१ वगळून **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.६ | **महाबळेश्वर निसर्ग पर्यटन विकास आराखडा, सातारा वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.१५८९.५० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन आराखडयातील बाब क्रमांक (A) ६ व (B) १, २ व ५ बाबत पुनर्विचार करुन उपवनसंरक्षक स्तरावर निर्णय घ्यावा या अटिसह **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.**<br>सदर निसर्ग पर्यटन स्थळाच्या आराखडया मधील (A) ब्रिटीश कालीन घोडेस्वारीचे वन भ्रमंती मार्ग २६ (राईडस) दुरुस्ती करणे व (B) महाबळेश्वर येथील १४ दृश्य स्थानकांना (पॉईटस) दुरुस्ती करणे या दोन |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | | बाबींना मान्यता प्रदान करण्यात आली. व (C) प्रतापसिंह वनोद्यान (D) स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्याना संबंधात सभेत सुचीत केल्यानुसार सुधारीत आराखडा सादर करावा. |
| २.७ | **पक्षीतीर्थ तबक उद्यान ता. पन्हाळा, निसर्ग पर्यटन विकास आराखडा, कोल्हापूर वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.८३१.०७ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन आराखडयातील बाब क्रमांक ३३ व ३५ वगळून **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.८ | **पारगड किल्ला ता. चंदगड निसर्ग पर्यटन विकास आराखडा, कोल्हापूर वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.४९८.६९ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.९ | **सुलगाव ता. आजरा येथे मशरुम व ऑर्किड पार्क निसर्ग पर्यटन विकास आराखडा, कोल्हापूर वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.३८५.३१ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.१० | **आंबिका माता कणदूर, निसर्ग पर्यटन विकास आराखडा, वनविभाग सांगली**<br>आराखडा किंमत रु.२९६.३७ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६ | सदर निसर्ग पर्यटन स्थळ असलेली जमिन ही वन विभागाची नसल्यामुळे **सदर आराखडा ना मंजूर करण्यात आलेला आहे.** |
| २.११ | **मौजे शिवरी फॉ.कं.नं. 324 मध्ये श्री. तुकाईमाता मंदीर व लगत परीसराचा निसर्ग पर्यटन विकास आराखडा, उप विवअ. भोर**<br>आराखडा किंमत रु.३९९.८८ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व आराखडयातील बाब क्रमांक ८ व २० सारख्याच असल्याने बाब क्रमांक २० वगळून तसेच बाब क्रमांक ६ करीता कार्य आयोजनेमध्ये तरतुदिचे अधिन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.१२ | **मौजे आंबेगव्हाण येथे बिबट सफारी निर्मिती निसर्ग पर्यटन विकास आराखडा, जुन्नर वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.८०४३.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) तसेच CZA चे मान्यतेच्या अधीन राहुन **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.१३ | **मौजे वगरवाडी औंढा (ना.) निसर्ग पर्यटन विकास आराखडा, हिंगोली वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.७२५.७६ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२४-२५ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** सुधारीत आराखडा मंडळाकडे त्वरीत सादर करावा. |

| | | |
|---|---|---|
| २.१४ | **श्री. क्षेत्र औंढा (नागनाथ) ता. औंढा जि. हिंगोली निसर्ग पर्यटन विकास आराखडा, हिंगोली वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.५४८.०५ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२४-२५ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** सुधारीत आराखडा मंडळाकडे त्वरीत सादर करावा. |
| २.१५ | **पद्मालय वन उद्यान, एरंडोल निसर्ग पर्यटन विकास आराखडा, जळगांव वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.१०९३.३७ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२६-२७ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| ३ | **सन २०२३-२४ करीताची सद्यस्थिती : सभेत माहिती देण्यात आली.** | |
| ४ | **मा.अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर उपस्थित होणारे विषय** : अध्यक्षांचे परवानगीने खालील निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकास आराखडयांचे सादरीकरण करण्यात आले. | |
| ४.१ | **कोयना अभयारण्य व चांदोली राष्ट्रीय उद्यान, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर**<br>आराखडा किंमत रु.८५००.०० लक्ष | निसर्ग पर्यटन स्थळ विकास आराखडयाचे क्षेत्र, कार्यबाबींचे स्थळ निश्चीत नसल्याने, प्रथम अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई यांचेशी चर्चा करुन मंडळाद्वारे निर्गमीत मार्गदर्शक तत्वांनुसार आराखडा तयार करुन सादर करावा. |

PDF Compressor Free Version

**कार्यकारी समितीद्वारे खालील प्रमाणे सुचना देण्यात आल्या :-**

- समितीचे असे निदर्शनास आले आहे की, निसर्ग पर्यटन स्थळाचे विकास आराखडयास मंडळाची मान्यता घेण्याआधीच जिल्हा विकास योजना व तत्सम स्त्रोतांकडून निधी प्राप्त करुन कामे करण्यात येत आहेत. व त्यानंतर आराखडा मंडळाचे कार्यकारी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येतात, हि बाब अत्यंत अनुचीत आहे. त्यामुळे मंडळाद्वारे आराखडयाला मान्यता प्राप्त झाल्याशिवाय निसर्ग पर्यटन स्थळाचे विकासाकरीता कोणत्याही स्त्रोताद्वारे निधी प्राप्त करुन घेऊ नये.
- निसर्ग पर्यटन स्थळाचे क्षेत्र वन जमीनच असावे, ईतर क्षेत्रांवर निसर्ग पर्यटन विकास आराखडा तयार करु नये तसेच विकास कामे प्रस्तावीत करु नये.
- मंडळाकडे निसर्ग पर्यटन विकास आराखडे सादर केल्यानंतर प्रत्यक्ष सभेत मात्र त्यांचेच स्तरावर सुधारीत आराखडयाचे सादरीकरण करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. मंडळाकडे सुधारीत

आराखडे सादर केल्यानंतरच सादरीकरण करावे. अश्या सुचना देण्यात आल्या, अन्यथा अश्या आराखडयांना मान्यता प्रदान करण्यात येणार नाही.

PDF Compressor Free Version

- राज्य निसर्ग पर्यटन धोरण-2008 व त्या अनुषंगाने मंडळाद्वारे निर्गमीत मार्गशंक तत्वे विचारात घेऊनच निसर्ग पर्यटन स्थळ विकास आराखडा तयार करणे अपेक्षीत आहे. परंतू कार्यकारी समिती समक्ष सादर करण्यात येत असलेल्या आराखडयांमध्ये या बाबी दिसून येत नसल्याने समितीने तिव्र नापसंती व्यक्त केली. निसर्ग पर्यटन स्थळ विकास आराखडे मार्गदर्शक तत्वांमध्ये निश्चीत मापदंडानुसारच तयार करण्याबाबत सुचना देण्यात आल्या.
- नवीन निसर्ग पर्यटन स्थळ विकसीत करणे अपेक्षित नसुन अस्तित्वातील निसर्ग पर्यटन स्थळांवर आवश्यक सोई-सुविधा तयार करणे, स्थानिकांचा सहभाग, त्यांची आवश्यकतेनुसार क्षमता बांधणी व पर्यटन स्थळ स्वयंचलीत असावे याचे नियोजन या बाबींचा समावेश असलेला विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष स्थिती, पर्यटन क्षमता, उपलब्ध पर्यटन बाबींचे अनुषंगाने आवश्यक सोई-सुविधा निसर्ग पर्यटनाद्वारे प्राप्त होणारे वास्तविकता दर्शक उत्पन्न व देखभाल / दुरुस्तीकरीता लागणारा खर्च या बाबींचा आराखडयात समावेश असावा.
- निसर्ग पर्यटन विकास आराखडा टप्प्या-टप्प्यात प्रस्तावीत करावा. प्रथम टप्प्यात अपेक्षेनुसार प्रतिसाद मिळाल्यानंतरच दुसरा टप्पा सुरु करावा.
- अनावश्यक बांधकामे, विविध वनोद्याने, कृत्रीम पायवाटा, पॅगोडा, वन्यप्राण्यांच्या प्रतिकृती ईत्यादी कामे टाळण्यात यावी. निसर्ग पर्यटन स्थळ ज्या बाबींकरीता प्रसिध्द आहे त्याला पोषक कार्यबाबी व प्रत्यक्ष पर्यटनाच्या दृष्टिने आवश्यक कार्यबाबींचाच आराखडयात समावेश करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.
- निसर्ग पर्यटनाची क्षमता नसलेल्या स्थळांचे आराखडे सादर करण्यात येऊ नये.
- आराखडयांचे सादरीकरणची PPT मंडळाकडे सभेपूर्वी सादर करावी.

सभेच्या शेवटी व्यवस्थापकीय संचालक, निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

**सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,**
**नागपूर**

**कार्यवृत्तांत प्र.मु.व.सं.(वबप्र) तथा**
**अध्यक्ष, का.स., मनिपविमं यांचेद्वारा मंजूर**

## दिनांक २७ जून, २०२३ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या १८ व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी

PDF Compressor Free Version

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वाय.एल.पी. राव | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| २ | श्री. प्रदीप कुमार | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ३ | श्री. एस.जी. टेंभुर्णीकर | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य,नागपूर |
| ४ | श्री. महीप गुप्ता | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, तथा सदस्य सचिव, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| ५ | सौ. सोनल एच. कामडी | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे प्रतिनिधी |
| ६ | श्री. राजेश तिवारी | सदस्य | व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सि.एम., नागपूर यांचे प्रतिनिधी |
| ७ | श्री. किशोर मिश्रीकोटकर | | उप महाप्रबंधक (कं), मनिपविमं, नागपूर |
| ८ | श्री. अमोल सातपुते | | उपवनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर |
| ९ | श्री. केशव वाबळे | | विभागीय वन अधिकारी, हिंगोली वनविभाग |
| १० | श्री. अमित भिसे | | सहाय्यक वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग |
| ११ | श्रीमती आशा भोंग | | सहाय्यक वनसंरक्षक (प्रा), भोर |
| १२ | श्री. यु.एम. बिराजदार | | सहाय्यक वनसंरक्षक, जळगांव वनविभाग |
| १३ | श्री. के.आर. होरे | | वनपरिक्षेत्र अधिकारी, हिंगोली वनविभाग |
| | **आभासी V.C. व्दारे सभेस उपस्थितांची यादी** | | |
| १ | डॉ. व्ही. क्लेमेंट बेन | | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई |
| २ | श्री. जी. गुरुप्रसाद | | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर |
| ३ | श्रीमती निता कट्टे | | उपवनसंरक्षक, सांगली वनविभाग |
| ४ | श्री. दिपक खाडे | | विभागीय वनअधिकारी, चिपळूण |
| ५ | श्री. एम.एन.मोहिते | | उपवनसंरक्षक, सातारा वनविभाग |
| ६ | श्री. वि.वि. होशिंग | | उपवनसंरक्षक, जळगांव वनविभाग |
| ७ | श्री. उत्तम सावंत | | उपवनसंरक्षक, चांदोली वन्यजीव विभाग सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर |